राज्य उत्पादन शुल्क विभागातील उप अधीक्षकांना अधीक्षक (गट-अ) या संवर्गात पदोन्नतीनंतर देण्यात येणाऱ्या पदस्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांकः- इएसटी-२७१९/प्र.क्र.४८/राउशु-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- १३ सप्टेंबर, २०१९

शासन आदेश-

राज्य उत्पादन शुल्क विभागातील उप अधीक्षक (गट-ब) या संवर्गातून अधीक्षक (गट-अ) या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१८-१९ च्या पदोन्नतीसूचीमधील खालील अधिकाऱ्यांना अधीक्षक (गट-अ) या संवर्गात खुल्या प्रवर्गातून पदोन्नती देण्यात येत असून सदर पदोन्नतीनंतर, त्यांची त्यांच्या नावासमोर (स्तंभ ४ येथे) दर्शविण्यात आलेल्या महसूली विभागामध्ये (स्तंभ ५ येथे) दर्शविण्यात आलेल्या रिक्त ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	मूळ प्रवर्ग	वाटप करण्यात आलेला महसूली संवर्ग	पदोन्नतीनंतर देण्यात येणारी पदस्थापना
१	२	३	४	५
१	श्री. रविकिरण र. कोले	इ.मा.व.	औरंगाबाद	अधीक्षक, राउशु, परभणी
२	श्री. युवराज गो. राठोड	विजा-अ	नाशिक	अधीक्षक, राउशु, नंदूरबार
३	श्री. स्नेहा सु. सराफ	खुला	अमरावती	अधीक्षक, राउशु, अकोला

२. सदर पदोन्नती ही, खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात, सेवाज्येष्ठतेनुसार, खुल्या प्रवर्गातील पदांवर मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. सदर तात्पुरत्या स्वरूपातील पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यास नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

२) संबंधित अधिकाऱ्यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षांनंतर, सेवा पुनर्विलोकनाच्या निर्णयाच्या अधीन राहून पदोन्नती देण्यात येत आहे.

३) संबंधित अधिकाऱ्यांची संगणक अर्हता परीक्षा आणि मराठी, हिंदी भाषा परीक्षा सूट/ उत्तीर्ण बाबतची प्रमाणपत्रे तपासून त्याबाबत आवश्यक त्या नोंदी घेतल्याची खात्री आयुक्त, राउशु कार्यालयाने करावी.

४) संबंधित अधिकाऱ्यांना स्थायित्व लाभ प्रमाणपत्र प्राप्त झाल्याची खात्री आयुक्त, राउशु कार्यालयाने करावी.

५) संबंधित अधिकाऱ्यांनी मत्ता व दायित्वाची विवरणपत्रे प्राप्त करावी.

३. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. सदर अधिकाऱ्यांना या आदेशाच्या दिनांकापासून कार्यमुक्त करण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांनी त्यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर होउन पदाचा कार्यभार घ्यावा.

४. सदर आदेशाच्या दिनांकापासून उक्त अधिकारी यांनी बदलीच्या ठिकाणी विहीत कालावधीमध्ये रूजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेविरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

५. सदर आदेशात बदल करून घेण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९१३१८०३०२१३२९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

P H WAGDE

Digitally signed by P H WAGDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=26d7295f0f289d96eecb9e12c2850ebd4f894edc0ea69760a3c1561515a6bf87, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=P H WAGDE
Date: 2019.09.13 20:13:53 +05'30'

(पु. हि. वागदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई व नागपूर.
३) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
४) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी, राउशु-२ व ३, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) संबंधित अधिकारी.
८) निवडनस्ती.

****